SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416 004 MAHARASHTRA
Colleges and University Development Section
PHONE :EPABX-2609000, 2609145
□ FAX :0091-231-2691533 & 0091-231-2692333
Website : www.unishivaji.ac.in E-mail: stats@unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर -४१६००४ महाराष्ट्र(महाविद्यालये व विद्यापीठ विकास विभाग)
दुरध्वनी: (ईपीएबीएक्स) २६०९०००, २६०९१४५
□ फॅक्स: ००९१-२३१-२६९१५३३,२६९२३३३,२६९३२९४

Estd: 1962
NAAC "A" Grade

जा.क्र. एस.यु/म.व.वि.वि.विभाग/ 371 दिनांक : 31 JUL 2019

प्रति,
(१) मा. अधिविभागप्रमुख / संचालक / केंद्रप्रमुख
(२) सर्व संबंधीत विद्यार्थ्यांचे एम.फील / पीएच.डी चे मार्गदर्शक/ सल्लागार (Mentor)
सर्व अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
(३) सर्व शिष्यवृत्तीधारक / अधिछात्रवृत्तीधारक
सर्व अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**विषय : शिष्यवृत्तीधारक / अधिछात्रवृत्तीधारक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती / अधिछात्रवृत्ती अंतर्गत अधिक प्राप्त झालेल्या रकमेबाबत.**
**संदर्भ : या कार्यालयाचे जा.क्र. एस.यु./म.व.वि.वि.विभाग/१०९९, दि. १२/१/२०१९ रोजीचे पत्र.**

महोदय / महोदया,

विद्यापीठातील विविध अधिविभागातील संशोधक विद्यार्थ्यांना विविध वित्तीय संस्थेकडून शिष्यवृत्ती / अधिछात्रवृत्ती मंजूर होत असते. दि. १/७/२०१६ पासून शिष्यवृत्तीधारक संशोधक विद्यार्थ्यांचे सातत्य प्रमाणपत्र, घरभाडे प्रमाणपत्र व इतर कागदपत्रे संबंधीत शिखर संस्थेच्या Web-Portal वर नोंदविल्यानंतर विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती ही त्यांच्या बँक खात्यावर परस्पर जमा होते. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि. १८/०५/२०१८ रोजीच्या परिपत्रकानुसार शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती कॅनरा बँकेमार्फत आदा करण्यात येत होती परंतू सदरचे सर्व कामकाज हे विद्यापीठामार्फत करण्यात येते. शिष्यवृत्ती घेणारे काही शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी हे अन्य ठिकाणी उच्च शिक्षणासाठी जातात अथवा शिष्यवृत्तीच्या कालावधी पूर्ण होणेचे आगोदर पी.एचडी प्रबंध सादर करतात किंवा राजीनामा देतात. विद्यार्थ्यांकडून याबाबत या विभागास माहिती देऊन UGC-Web Portal वर त्यांची शिष्यवृत्ती Discontinue तसेच Stop Payment करणे आवश्यक आहे. तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमानुसार वेब पोर्टलवर शिष्यवृत्तीधारकाचे विद्यार्थ्यांचे सातत्य प्रमाणपत्र, घरभाडे प्रमाणपत्र व इतर कागदपत्रे नोंदविलेल्या कालावधी नंतरची फेलोशिप विद्यार्थ्यास प्राप्त झालेली दिसून येते.

या संदर्भात आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, UGC Web Portal Online Fellowship ची कार्यवाही दि. १/७/२०१६ पासून कार्यरत असून Online Portal द्वारे शिष्यवृत्ती/ फेलोशिप प्राप्त होणाऱ्या अधिविभागातील शिष्यवृत्तीधारक संशोधक विद्यार्थ्यांना विविध शिखर संस्थेकडून मंजूर झालेल्या शिष्यवृत्तीच्या कालावधीनंतरची जादा जमा झालेली शिष्यवृत्ती / फेलोशिपची रक्कम तूर्त विद्यापीठास जमा करणे आवश्यक असून ती सदर विद्यार्थ्यांनी केलेली आढळून येत नाही. तरी, सदरची कार्यवाही दि. २०/०८/२०१९ पूर्वी करणे आवश्यक आहे. यानुषंगाने कार्यवाही न केलेस सदर विद्यार्थ्यास "डिफॉल्टर" घोषित करून त्याबाबतची माहिती विद्यार्थी सध्या ज्या संस्थेत/ कार्यालयात कार्यरत आहेत तेथे विद्यापीठाकडून कळविण्यात येईल व यानुसार होणाऱ्या कोणत्याही परिणामास विद्यापीठ जबाबदार राहणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी तसेच अधिविभागातील असे काही शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी असतील तर संबंधीत अधिविभागप्रमुख, मार्गदर्शक यांनी विद्यार्थ्यांशी संपर्क साधून याबाबत कार्यवाही पूर्ण करणेबाबत कळवावे ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

कुलसचिव
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Estd: 1962
NAAC "A" Grade

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416 004 MAHARASHTRA**
**Colleges and University Development Section**
PHONE :EPABX-2609000, 2609145
□ FAX :0091-231-2691533 & 0091-231-2692333
Website : www.unishivaji.ac.in E-mail: stats@unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर -४१६००४ महाराष्ट्र(महाविद्यालये व विद्यापीठ विकास विभाग)
दुरध्वनी: (ईपीएबीएक्स) २६०९०००, २६०९१४५
□ फॅक्स: ००९१-२३१-२६९१५३३,२६९२३३३,२६९३२९४

जा.क्र. एस.यु/म.व.वि.वि.विभाग/1099 दिनांक : 12 JAN 2019

प्रति,

(१) मा. अधिविभागप्रमुख / संचालक / केंद्रप्रमुख
सर्व अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

(२) सर्व शिष्यवृत्तीधारक / अधिछात्रवृत्तीधारक
सर्व अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**विषय : शिष्यवृत्तीधारक / अधिछात्रवृत्तीधारक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती / अधिछात्रवृत्ती अंतर्गत अधिक प्राप्त झालेल्या रकमेबाबत.**

महोदय / महोदया,

विद्यापीठातील विविध अधिविभागातील संशोधक विद्यार्थ्यांना विविध वित्तीय संस्थेकडून शिष्यवृत्ती / अधिछात्रवृत्ती मंजूर होत असते. शिष्यवृत्तीधारक संशोधक विद्यार्थ्यांचे सातत्य प्रमाणपत्र, घरभाडे प्रमाणपत्र व इतर कागदपत्रे संबंधीत शिखर संस्थेच्या Web-Portal वर नोंदविल्यानंतरच विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती ही त्यांच्या बँक खात्यावर परस्पर जमा होते. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि. १८/०५/२०१८ रोजीच्या परिपत्रकानुसार शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती कॅनरा बँकेमार्फत आदा करण्यात येत होती परंतू सदरचे सर्व कामकाज हे विद्यापीठामार्फत करण्यात येते. शिष्यवृत्ती घेणारे काही शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी हे अन्य ठिकाणी उच्च शिक्षणासाठी जातात अथवा शिष्यवृत्तीच्या कालावधी पूर्ण होणेचे आगोदर पी.एचडी प्रबंध सादर करतात किंवा राजीनामा देतात. विद्यार्थ्यांकडून याबाबत या विभागास माहिती देऊन UGC- Web Portal वर त्यांची शिष्यवृत्ती Discontinue तसेच Stop Payment करणे आवश्यक आहे. तसेच UGC या वित्तीय संस्थेकडून काही वेळा पुढील कालावधीमधील शिष्यवृत्ती ही त्यांच्या बँक खात्यावर जमा होते.

या संदर्भात आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, अधिविभागातील संशोधक विद्यार्थ्यांना विविध वित्तीय संस्थेकडून मंजूर झालेल्या शिष्यवृत्तीधारकास त्यांच्या शिष्यवृत्तीच्या कालावधीनंतरची शिष्यवृत्ती / फेलोशिप जमा झालेली दिसून येते. तरी अशा विद्यार्थ्यांनी सदर मुदतीनंतर प्राप्त झालेली रक्कम संबंधीत शिखर संस्थेस पाठविणे आवश्यक आहे. सबब, प्राप्त झालेल्या रकमेचा धनादेश अथवा धनाकर्ष **The Secretary, University, Grants Commission, New Delhi** यांचे नावे काढून सदर कालावधीमधील विवरणपत्रे व विनीयोग दाखला संबंधित विद्यार्थ्यांनी अधिविभागामार्फत या कार्यालयास सादर करावेत.

कळावे,

आपला विश्वासू,

कुलसचिव
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर